بسم اللہ الرحمٰن الرحیم    نحمدہ ونصلی علی رسولہ الکریم    وعلی عبدہ المسیح الموعود
لا الٰہ الا اللہ محمد رسول اللہ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA
Ph:+91-1872-220186, Fax: +91-1872-224186, Mob. +91-98154-94687, E-mail:ansarullahbharat@gmail.com

# सत्याच्या संदर्भात प्रेषित मुहम्मद ﷺ यांच्या पवित्र जीवनचरित्राचा प्रेरणादायी उल्लेख

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔
إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔
صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

**जुम्मा खुतब्याचा संक्षेप: सय्यदना अमीरुल मोमिनीन हजरत मिर्ज़ा मसरूर अहमद, खलीफतुल मसीह पाचवे (अल्लाह तआला त्यांना आपल्या शक्तिशाली मदतीने समर्थ करो) १७ एप्रिल २०२६ (१७ शहादत १४०५ हिजरी), मस्जिद मुबारक, इस्लामाबाद, यूके -**

तशह्हुद, तअव्वुज आणि सूरह फातिहा यांच्या तिलावतनंतर हुज़ूर अनवर (अल्लाह तआला त्यांना आपल्या मदतीने समर्थ करो) यांनी सूरह यूनुस की आयतें 17 और 18 का पाठ किया, जिसके बादफ़रमाया:याआयतांचाअर्थ असा आहे की:तू त्यांना सांग की जर अल्लाहची अशीच इच्छा असती की याच्या ऐवजी दुसरी काही शिकवण दिली जावी, तर मी ती तुम्हाला वाचून दाखवली नसती आणि त्यानेही तुम्हाला या शिकवणीची माहिती दिली नसती. यापूर्वी मी तुमच्यामध्ये बराच काळ घालवला आहे—तरीही तुम्ही बुद्धीचा वापर करत नाही का?मग तुम्हीच सांगा की जो अल्लाहवर खोटा आरोप करतो किंवा त्याच्या चिन्हांना खोटे ठरवतो, त्यापेक्षा मोठा अन्यायी कोण असू शकतो? नक्कीच, अपराधी लोक कधीच यशस्वी होत नाहीत.आज पैगंबर मुहम्मद यांच्या जीवनातील विविध पैलूंचा उल्लेख केला जात आहे. आज त्यांच्या उत्तम चारित्र्य, सत्यनिष्ठा, सत्य आणि प्रामाणिकपणाबद्दल चर्चा केली जाईल.

आप ﷺ यांच्या जीवनातील घटनांमध्ये तुमच्या सत्यतेची अत्युच्च उदाहरणे आढळतात. शत्रूही तुमच्या प्रामाणिकपणाच्या सर्वोच्च मापदंडाचा स्वीकार केल्याशिवाय राहू शकत

नाही. प्रेषित मुहम्मद ﷺ यांनी आपल्या अनुयायांना देखील हीच शिकवण दिली आहे की सत्यतेचे सर्वोच्च मानक स्थापित करा. म्हणून आज या संदर्भात आपण सर्वांनी आपापले आत्मपरीक्षण करण्याची आवश्यकता आहे. हे सत्याचे सर्वोच्च मानकच आपल्या जीवनातील प्रत्येक क्षणात यशाची हमी देतात आणि त्याचप्रमाणे आपल्या साठी प्रचार (प्रबोधन) करण्याचे मार्गही उघडतात. फ़रमाया :रसूल अल्लाह ﷺ यांच्या पवित्र जीवनाचा उल्लेख करताना  हज़रत मुस्लेह मौऊद (रज़ि) ने फ़रमाया आपण रसूल करीम ﷺ यांच्याबद्दल पाहतो की  आपल्या शत्रूंनी देखील कबूल केले की आपण सत्यवादी आणि विश्वासू (ईमानदार) होतात आणि त्यांनी आपल्यावर कोणताही आरोप लावला नाही. शत्रूंनीही आपल्या सत्यनिष्ठा आणि पवित्रतेची साक्ष दिली. म्हटले की पैगंबर मुहम्मद ﷺ यांची ती कोणती गोष्ट होती जी विरोधकांवर प्रभाव टाकत असे? ते सुरुवातीला कुरआन करीममुळे प्रभावित झाले नव्हते, तर ते मुहम्मद ﷺ यांच्या पूर्व जीवनामुळे प्रभावित झाले होते. आपण त्यांच्यामध्ये राहिलेले असताना आपली प्रामाणिकता, सत्यनिष्ठा, मानवतेबद्दलची सहानुभूती आणि त्याग यांचाच त्यांच्यावर प्रभाव पडत असे. दाव्यापूर्वी आपण त्यांना शिर्कपासून थांबवत नव्हता, कारण हा अल्लाहचा आदेश नव्हता, परंतु आपण स्वतः मात्र कधीही शिर्क करणारे नव्हता. म्हणून आपले आचार-विचार यांचीच श्रेष्ठता होती ज्याचा प्रभाव पडत असे, आणि हा प्रभाव हळूहळू आतल्या आत खोलवर परिणाम करत जात असे.

हज़रत अक़दस मसीह मौऊद (अलैहिस्सलाम) फ़रमाते हैं कि अल्लाह तआला ने हमारे सैयद और मौला, नबी आख़िरुज़्ज़मान ﷺ, जो सैयदुल-मुत्तक़ीन थे, को विभिन्न प्रकार की सहायता और समर्थन से विजयी और समर्थ बनाया। जरी सुरुवातीला हज़रत मूसा (अ.स.) आणि हज़रत ईसा (अ.स.) यांच्यासारखा हिजरतीचा (स्थलांतराचा) अनुभव आप ﷺ यांनाही आला, तरी तीच हिजरत आपल्या आत विजय आणि सहाय्याचे आरंभिक संकेत घेऊन आली होती. मित्रांनो! नक्की समजा की, नीतिमान (परहेजगार) व्यक्ती कधीही नष्ट केला जात नाही. जेव्हा दोन पक्ष परस्पर शत्रुत्व करतात आणि वैर टोकाला पोहोचवतात, तेव्हा जो पक्ष अल्लाहच्या दृष्टीने नीतिमान आणि परहेजगार असतो, त्याच्यासाठी आकाशातून मदत उतरते. अशा प्रकारे दैवी निर्णयाने धार्मिक वाद-विवाद समाप्त होतात. म्हटले: अल्लाह तआला आपल्या नबी ﷺ यांना उद्देशून म्हणतो की “आणि निःसंशय तू उच्चतम सद्चारित्र्यावर आहेस” (وَإِنَّكَ لَعَلَىٰ خُلُقٍ عَظِيمٍ), म्हणजेच तू महान चारित्र्यावर स्थिर आहेस. याचा अर्थ असा की सर्व प्रकारचे सद्गुण तुझ्यात एकत्रित झाले आहेत. थोडक्यात, माणसाच्या हृदयात जितक्या क्षमता/शक्ती असतात, त्या सर्व नैसर्गिक अवस्था जेव्हा बुद्धी आणि विचारपूर्वक निर्णय यांच्या सल्ल्याने योग्य ठिकाणी प्रकट केल्या जातात, तेव्हा त्या सर्वांना मिळून “नैतिकता” (चारित्र्य/अख़लाक) असे म्हणतात. पैगंबर मुहम्मद ﷺ सत्य जगात पसरवण्यासाठी आले होते, म्हणून विविध प्रसंगी त्यांनी आपल्या अनुयायांनाही सत्याचा अवलंब करण्याची शिकवण दिली आहे. एका प्रसंगी

रसूल अल्लाह ﷺ यांनी फ़रमावले: तुमच्यावर सत्य बोलणे अनिवार्य आहे, कारण सत्य चांगुलपणाकडे घेऊन जाते आणि चांगुलपणा स्वर्गाकडे घेऊन जातो. कोणी व्यक्ती सतत सत्य बोलत राहते आणि सत्याच्या शोधात गुंतलेली राहते, इतके की शेवटी ती अल्लाहकडे ‘सिद्दीक’ म्हणून लिहिली जाते. तुम्ही लोक खोटेपणापासून दूर राहा, कारण खोटेपणा पापाकडे घेऊन जातो आणि पाप नरकाग्नीकडे घेऊन जाते. माणूस सतत खोटे बोलत राहतो, इतके की शेवटी तो अल्लाहकडे ‘कज्जाब’ (अत्यंत खोटारडा) म्हणून लिहिला जातो. एका अन्य प्रसंगी आपण ﷺ यांनी फ़रमावले की खोटेपणा कोणत्याही परिस्थितीत योग्य नाही—ना गंभीर अवस्थेत, ना मजेमध्ये. आणि असेही नाही की एखादी व्यक्ती आपल्या मुलाशी वचन देऊन ते पूर्ण करत नाही. अल्लामा राजी (रह.)

सूरह तौबा की आयत 119 की तफ़सीर में फ़रमाते हैं: एक व्यक्ती नबी ﷺ यांच्या जवळ आला आणि त्याने सांगितले की मी असा माणूस आहे जो आपल्या वाईट सवयींपासून वाचू इच्छितो, पण माझ्यात मद्यपान, चोरी, व्यभिचार आणि खोटे बोलण्याच्या सवयी खूप आहेत. लोक म्हणतात की तुम्ही या गोष्टींना हराम (निषिद्ध) घोषित करता. माझ्यात इतकी ताकद नाही की मी या सर्व गोष्टी सोडू शकेन. जर तुम्ही फक्त एकाच गोष्टीवर मला समाधान दिले, तर मी तुमच्यावर ईमान आणेन.पैगंबर मुहम्मद ﷺ यांनी फ़रमावले की ठीक आहे, तुम्ही खोटे बोलणे सोडून द्या त्यानंतर त्याने (त्या व्यक्तीने खोटे बोलणे सोडण्याचे वचन दिले आणि तो मुस्लिम झाला मग जेव्हा तो नबी ﷺ यांच्या जवळून बाहेर पडला, तेव्हा त्याला त्या सर्व वाईट गोष्टींच्या संधी मिळू लागल्या. पण या विचाराने की जर तो त्या वाईट गोष्टींमध्ये गुंतला आणि नबी ﷺ यांनी त्याबद्दल विचारले, तर त्याला सत्य बोलावे लागेल, त्यामुळे तो त्या सर्व वाईट गोष्टींपासून स्वतःला वाचवत राहिला. हज़रत अबू बकर सिद्दीक़ (रज़ि) यांना जेव्हा पैगंबर मुहम्मद ﷺ यांचा नबुव्वतचा “दाव्याची बातमी मिळाली” , तेव्हा ते रसूल अल्लाह ﷺ यांच्या जवळ आले आणि म्हणाले की मला तुमच्याबद्दल एक गोष्ट कळली आहे. -आप ﷺ यांनी फ़रमावले: “हे अबू बकर! तुम्हाला माझ्याबद्दल कोणती गोष्ट कळली आहे?” हज़रत अबू बकर (रज़ि) यांनी अर्ज केला की मला एवढेच कळले आहे की आपण लोकांना अल्लाहच्या तौहीदकडे (एकेश्वरवादाकडे) बोलावत आहात आणि आपण म्हणता की आपण अल्लाहचे रसूल आहात. रसूल अल्लाह ﷺ यांनी फ़रमावले: होय! माझ्या अल्लाहने मला शुभवार्ता देणारा (बशीर) आणि इशारा देणारा (नज़ीर) बनवले आहे, आणि मला इब्राहीम (अ.स.) यांची दुआ बनवले आहे, तसेच मला सर्व मानवजातीकडे पाठवले आहे. हज़रत अबू बकर (रज़ि) यांनी अर्ज केला की अल्लाहची शपथ! मी कधीही आपल्याला खोटे बोलताना पाहिले नाही. आपण आपल्या प्रामाणिकतेच्या महानतेमुळे, नातेवाईकांशी चांगले संबंध ठेवण्यामुळे आणि उत्तम कर्मांमुळे नबुवतीसाठी अधिक योग्य आहात. आपला हात पुढे करा, म्हणजे मी आपल्याशी बैअत (निष्ठेची शपथ) करीन.

यानंतर रसूल अल्लाह ﷺ यांनी आपला पवित्र हात पुढे केला आणि हज़रत अबू बकर (रज़ि) यांनी आपल्याशी बैअत केली.

हज़रत खदीजा (रज़ि) यांनी वह्यीच्या सुरुवातीच्या प्रसंगी पैगंबर मुहम्मद ﷺ यांच्या प्रामाणिकपणा आणि सत्यतेबद्दल जे महान शब्द म्हटले: त्याचा उल्लेख करताना हज़रत अक़दस मसीह मौऊद (अ.स.) म्हणतात: विचार करा की पंचावन्न वर्षांच्या त्या स्त्रीने, जी आपली पत्नी आणि आपलीच जमातीची होती आणि जी पंधरा वर्षांपासून आपल्याशी विवाहबद्ध होती, ती कोणती साक्ष देते? खदीजा (रज़ि) यांची साक्ष त्या वेळी, जेव्हा आपण ﷺ दुःखी आणि चिंताग्रस्त होते, विचार करण्यासारखी आहे. जर आपल्यामध्ये ही गुणवैशिष्ट्ये नसती, तर खदीजा (रज़ि) यांचे हे वक्तव्य त्या वेळी कधीही दिलासा देणारे ठरले नसते. शिअब-ए-अबी तालिबमध्ये (बनू हाशिमच्या बहिष्काराच्या काळात) तिसरे वर्ष जवळ येत असताना, पैगंबर मुहम्मद ﷺ यांना अल्लाहकडून माहिती मिळाल्यानंतर त्यांनी आपल्या चाचा अबू तालिब यांना सांगितले की काबा शरीफमध्ये लटकवलेल्या बनू हाशिमच्या बहिष्काराच्या करारातील संपूर्ण मजकूर, अल्लाहच्या नावाचा उल्लेख सोडून, दीमकाने खाऊन टाकला आहे हज़रत अबू तालिब यांना पैगंबर मुहम्मद ﷺ यांच्या म्हणण्यावर इतका विश्वास होता की त्यांनी आपल्या भावांना ही गोष्ट सांगताना म्हटले की मुहम्मद ﷺ यांनी आजपर्यंत माझ्याशी कधीही खोटे बोलले नाही. म्हणून ते त्यांच्यासोबत कुरैशच्या सरदारांकडे गेले आणि त्यांना म्हणाले की माझ्या पुतण्याने मला ही गोष्ट सांगितली आहे आणि त्याने माझ्याशी कधीही खोटे बोलले नाही. म्हणून जर माझा पुतण्या खरा ठरला, तर तुम्हाला आपल्या बहिष्काराच्या निर्णयापासून मागे हटावे लागेल, आणि जर तो खोटा ठरला, तर मी त्याला तुमच्या हवाली करीन इच्छा असेल तर त्याला मारून टाका, आणि इच्छा असेल तर त्याला जिवंत ठेवा. जेव्हा तो करार पाहिला गेला, तेव्हा तो अगदी तसाच होता जसा रसूल अल्लाह ﷺ यांनी सांगितला होता. त्यामुळे कुरैश आपल्या लोकांसमोर लज्जित झाले. म्हटले: अबू जहल मुहम्मद रसूल अल्लाह ﷺ यांचा किती मोठा शत्रू होता पण त्यानेही एका प्रसंगी असे म्हटले, ज्याचा उल्लेख हज़रत मुस्लेह मौऊद (रज़ि) यांनी म्हटले तो म्हणाला: (अबू जहल)आम्ही तुला खोटारडा म्हणत नाही, परंतु तू जी शिकवण मांडत आहेस तिचा आम्ही इन्कार करतो. म्हणजेच, अबू जहलसारखा कट्टर विरोधक आणि काळया मनाचा माणूसही मुहम्मद रसूल अल्लाह ﷺ यांना खोटारडे म्हणण्यासाठी तयार नव्हता.

उमय्या इब्न खल्फही आप ﷺ यांचा एक अत्यंत कट्टर विरोधक होता, परंतु एका प्रसंगी त्याच्या तोंडातूनही हे शब्द बाहेर पडले की, “अल्लाहची शपथ! जेव्हा मुहम्मद ﷺ बोलतात तेव्हा ते नेहमी सत्यच बोलतात, ते कधीही खोटे बोलत नाहीत. म्हणतात, जादू तोच जो डोक्यावर चढून बोलतो. मुहम्मद ﷺ यांचा हा किती मोठा “प्रभाव” होता की त्यांनी आपल्या शत्रूंनाही आपल्या सत्यता आणि प्रामाणिकतेची कबुली द्यायला लावली.

मदीनेतील यहुदींचीही साक्ष मिळते की मुस्लिम आणि यहुदी जमात बनू कुरैझा यांच्यात परस्पर सहकार्याचा करार होता. अहज़ाबच्या युद्धाच्या वेळी, बनू नज़ीरचा सरदार हय्यी इब्न अख़तब, बनू कुरैझाकडे गेला आणि सरदार कअब इब्न असद अल-कुरैझी याला मुस्लिमांशी केलेला करार तोडण्यास आणि कुरैशांना मदत करण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला, जेणेकरून मुस्लिमांचा पराभव करता येईल. या प्रसंगी कअब इब्न असद, जो बनू कुरैझाचा सरदार आणि मुस्लिमांचा शत्रू होता, तो म्हणाला: “मी मुहम्मद ﷺ यांच्याशी करार केला आहे आणि मी तो करार कधीही तोडणार नाही. मला त्यांच्याकडून निष्ठा आणि प्रामाणिकतेशिवाय काहीही दिसलेले नाही. एका प्रसंगी पैगंबर मुहम्मद ﷺ यांनी फ़रमावले की मी विनोद करतो, परंतु त्यामध्येही मी फक्त सत्यच बोलतो. त्याचप्रमाणे आपण ﷺ यांनी फ़रमावले की त्या व्यक्तीचा नाश होवो जो लोकांना हसवण्यासाठी बोलतो आणि खोटे बोलतो.

मुस्लेह मौऊद (रज़ि) ने फ़रमाया:” रसूल करीम ﷺ यांचे वैयक्तिक स्थान सत्याच्या बाबतीत इतके उच्च होते की त्यांच्या समुदायाने त्यांना “सिद्दीक” हे नाव देऊन सन्मान केले. आप ﷺ ने आपल्या समुदायालाही नेहमी सत्यावर ठाम राहण्याचे आणि सत्याचे पालन करण्याचे महत्त्व पटवून दिले. आप ﷺ म्हणत असत की सत्यच माणसाला चांगुलपणाकडे नेते, आणि चांगुलपणा माणसाला स्वर्गात पोहोचवतो. सत्याचे खरे स्थान म्हणजे माणूस सतत सत्य बोलत राहतो, इतके की अल्लाहच्या समोरही तो सत्यवादी समजला जातो.हुज़ूर अनवर ने फ़रमाया :आज प्रत्येक अहमदीचे काम आहे की आपण आपले आत्मपरीक्षण करावे, आपल्या सत्यतेचे मापदंड काय आहेत हे पहावे, आणि ज्या कमकुवतपणाचे पैलू आहेत, त्यांना आपण दूर करावे.

खुतबेच्या समाप्तीवर हुज़ूर अनवर ने नमाज जणाज़ा( अ नुपस्थित मृत व्यक्तीसाठी अदा केलेली नमाज)अदा करण्याची घोषणा केली.

اَلْحَمْدُ لِلّٰهِ نَحْمَدُهٗ وَنَسْتَعِيْنُهٗ وَنَسْتَغْفِرُهٗ وَنُؤْمِنُ بِهٖ وَنَتَوَكَّلُ عَلَيْهِ وَنَعُوْذُ بِاللّٰهِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَيِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ يَّهْدِهِ اللّٰهُ
فَلَا مُضِلَّ لَهٗ وَمَنْ يُّضْلِلْهُ فَلَا هَادِيَ لَهٗ وَنَشْهَدُ أَنْ لَّا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَنَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ عِبَادَ اللّٰهِ رَحِمَكُمُ اللّٰهُ اِنَّ اللّٰهَ يَأْمُرُ
بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِيْتَآءِ ذِي الْقُرْبٰى وَيَنْهٰى عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْكَرِ وَالْبَغْيِ يَعِظُكُمْ لَعَلَّكُمْ تَذَكَّرُوْنَ اُذْكُرُوا اللّٰهَ يَذْكُرْكُمْ وَادْعُوْهُ
يَسْتَجِبْ لَكُمْ وَلَذِكْرُ اللّٰهِ اَكْبَرُ۔